# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 16/08/2021 (सोमवार)

(दुपार)

---

### विनयभंग

पो.स्टे. भिवापुर :– दिनांक 14/08/2021 चे 02.00 वा. दरम्यान फिर्यादी यांची मुलगी/पीडिता वय 10 वर्ष हि घरी एकटी हजर असतांना आरोपी नामे– प्रकाश जागोजी जनबंधु, वय 58 वर्ष, रा. भिवापुर याने घरामध्ये अनाधिकृतपणे प्रवेश करून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम 354 (अ), 451 भादंवी. सहकलम 8 पोक्सो कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री शरद भस्मे मो. क्र. 9764946808 हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. भिवापुर – दिनांक 14/08/2021 चे 02.00 वा. चे सुमारास पो.स्टे. भिवापुर हद्दीत फिर्यादी यांची 15 वर्षीय अल्पवयीन मुलगी हिला संशयीत आरोपी नामे– गुणवत्ता जुगनाके, रा. नागभिड, जि. चंद्रपुर याने तिला लग्नाचे आमिष दाखवुन फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री शरद भस्मे मो. क्र. 9764946808 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर